# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆ : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०




## ◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 1095.
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 25 JUL 2022

## सुधारीत परिपत्रक क्र. - 58 /२०२२

सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा.प्राचार्य/संचालक व परीक्षा केंद्राचे संचालक यांना या परिपत्रकाद्वारे आदेशान्वये कळविण्यात येते की, परीक्षा विभागाच्या दि.१२ जुलै २०२२ रोजीच्या परिपत्रकातील अनुक्रमांक ५ मध्ये नमूद सूचनेनुसार प्रत्येक महाविद्यालयामध्ये दोन अंतर्गत व दोन बहिस्थ: पर्यवेक्षक (सकाळी ७:१५ ते १:३० आणि दुपारी १:०० ते ७:१५) या वेळेत नेमावेत असे कळविले होते.

परंतु अनेक महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या सूचनानुसार सद्यस्थितीत बऱ्याचशा महाविद्यालयातील परीक्षा या सर्व सत्रामध्ये सुरु नसून केवळ काही ( १ ते २ आणि ३) सत्रामध्ये या परीक्षा होत आहेत. त्यामुळे प्रत्येक परीक्षा केंद्रावर एक बहिस्थ: व एक अंतर्गत पर्यवेक्षक नेमला तरी चालेल अशी सूचना प्राप्त होत आहे. सद्यस्थितीत सुट्टया असल्याने प्रत्येक महाविद्यालयात दोन बहिस्थ: पर्यवेक्षक नेमणे विद्यापीठासही जिकरीचे होत आहे. तसेच बऱ्याचशा बहिस्थ: पर्यवेक्षकाकडून आदेश नाकारले जात आहेत.

विद्यापीठाच्या यापूर्वीच्या परीक्षा हया २:३० ते ३ तासचे पेपर सकाळ व दुपार असे दोन सत्रात होत असत तेव्हा दोन सत्रासाठी विद्यापीठाकडून एकच बहिस्थ: पर्यवेक्षक नेमला जात होता आणि महाविद्यालयासही एकच अंतर्गत पर्यवेक्षक नेमण्यास सांगण्यात येत होते. आता आपण केवळ ७५ मि. (सव्वा तासाचे) पाच सेशन घेत आहोत काही प्राध्यापकांना परीक्षा केंद्रावर दुसऱ्या गावावरुन पोहचावे लागते यासाठी ज्या ठिकाणी सकाळी ९ ते रात्री ६:१५ पर्यत पाच सेशन असतात अशा ठिकाणी अडचणी निर्माण होऊ नये यासाठी विद्यापीठाने सरसकट सर्व परीक्षा केद्रासाठी दोन अंतर्गत व दोन बहिस्थ: पर्यवेक्षक नेमण्यासाठी दि.१२ जुलै २०२२ रोजी परिपत्रकान्वये कळविले होते.

परंतु बहुतांश परीक्षा केंद्रावर दोन किंवा तीन सत्रात सव्वा तासाचे पेपर सुरु असून फक्त मोजक्याच (जी मोठी महाविद्यालये आहेत किंवा ज्या महाविद्यालयात अनेक अभ्यासक्रम सुरु आहेत) परीक्षा केंद्रावर एकूण पाच सत्रात परीक्षा सुरु आहेत.

त्यामुळे आपणास सुधारीत आदेशानुसार असे कळविण्यात येते की, ज्या ठिकाणी सव्वा तसाचे केवळ दोन किंवा तीन सत्र सुरु असतील अशा ठिकाणी महाविद्यालयाने एक अंतर्गत पर्यवेक्षक नेमावा, विद्यापीठाने एकच बहिस्थ: पर्यवेक्षक नेमलेला आहे. परंतु ज्या महाविद्यालत सव्वा तासाचे चार किंवा पाच सत्र सुरु आहेत अशा ठिकाणी मात्र संबंधित महाविद्यालयाने दोन अंतर्गत पर्यवेक्षक नेमावेत आणि दोन बहिस्थ: पर्यवेक्षक नेमण्याबाबतचे पत्र परीक्षा विभागाकडे पाठवावे त्यांनतर आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करुन आपणास अधिकचा एक बहिस्थ: पर्यवेक्षक नेमून दिला जाईल. सदरचा सुधारीत आदेश दि.२४/०७/२०२२ ते ०३/०८/२०२२ या दरम्यान सुरु असलेल्या आणि त्यापुढील सर्व परीक्षांसाठी लागू होईल.

या सुधारीत आदेशाची सर्वांनी नोंद घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

(डॉ. शिवकुमार गणपूर )
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत-वरीलप्रमाणे
जावक क्रं. : पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन /वेळापत्रक/२०२२/
दिनांक :
प्रत- माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव
मा. प्राचार्य/प्राचार्या/संचालक. सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये. प्रस्तुत विद्यापीठ